डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
barti
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/योजना विभाग/IBPS(०७)/२०२३-२४/१८०५ दि. १५/०२/२०२४

# Shortfall Documents Notification

Tender ID: 2023_SJASA_933806_1

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्याकडून अनुसूचित जातीतील युवक युवतींसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. व लिपीक वर्गीय तत्सम पदाच्या स्पर्धा पूर्व निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याकरिता दि.०९/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in व http://barti.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदा धारकांनी जोडलेल्या कागदपत्रांची तांत्रिक मूल्यामापन करताना असे आढळून आले की, निविदा धारकांनी तांत्रिक लिफाफ्यातील निकषांच्या आवश्यकतेनुसार कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर केली आहेत. म्हणून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.१७/०९/२०१९ रोजी नुसार तांत्रिक समितीने खालील तपशिलानुसार कागदपत्रे ऑनलाईन सादर करण्यासाठी खालील निविदा धारकांना सूचित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कमी/अपूर्ण कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | गरुडझेप करिअर अकॅडमी | १. मागील पाच वर्षातील बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>२. उपयोगात असलेल्या इमारतीचा नकाशा मालकी दर्शवणारे कागदपत्रे / करारनामे यांमध्ये क्षेत्रफळ नमूद नाही.<br>३. संस्थेचे वेबपेज ,वेबसाईट असलेबाबत पुरावे जोडावे.<br>४. वाय-फाय सुविधायुक्त प्रशिक्षण हॉल बाबत पुरावे जोडावे.<br>५. वातानुकुलीत स्वतंत्र अभ्यासिकेमध्ये किती विद्यार्थी क्षमतेची बैठकव्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>६. स्वतंत्र कार्यालय,सी.सी.टी.व्ही. यंत्रणा,बायोमेट्रिक सुविधा याबाबत पुरावे जोडावे.<br>७. वसतिगृहाबाबत पुरावे जोडलेले नाहीत.तसेच वसतिगृहामध्ये किती विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची सोय आहे याची क्षमता नमूद करावी.<br>८. वसतिगृहामध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा,अग्निशामक यंत्रणा तसेच गृहपाल व सुरक्षारक्षक याबाबतचे पुरावे जोडावे.<br>९. तज्ञ व्याख्याते / प्रशिक्षकांचे करारनामे / वर्कऑर्डर / पगारपत्रक / मानधनपत्र / शैक्षणिक पात्रता व अनुभव याबाबतचे पुरावे जोडावे.<br>१०. मागील ३ वर्षातील (कोविड काळ वगळता सन २०२० - २१ व २०२१-२२) लेखापरीक्षण अहवाल व Turn over Certificate जोडावे.<br>११. शासकीय यंत्रणा/ विभाग यांचे सोबतचे कार्यारंभ आदेश / सामंजस्य करार जोडावे. |

| | | |
|---|---|---|
| | | १२. संस्थेचे स्वतंत्र Android आणि IOS मोबाईल ॲप तसेच Online प्रशिक्षण देण्याचे संसाधने Digital Studio याबाबतचे पुरावे जोडावे.<br>१३. संगणक कक्ष विद्युत बॅकअप सह पुरावे जोडून संगणक संख्या नमूद करावी. तसेच ऑनलाईन टेस्ट सिरीज व अनुसूचित जातीतील असल्याचा पुरावा जोडावा.<br>१४. संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम नुसार पंजीबद्ध / प्रायव्हेट लि.कंपनी नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.<br>१५. संस्थेने मागील एका वर्षाचे आयकर भरणा केलेबाबतचे विवरण पत्र तसेच संस्थेच्या नावे रु.५,००,०००/- (Bank Solvency Certificate) निविदा प्रसिद्ध झालेनंतरचे सादर करणे आवश्यक.<br>१६. परिशिष्ठ 'ब' मध्ये निविदेच्या अटी व शर्ती मान्य झालेबाबतचे हमीपत्र जोडावे. तसेच संस्थेचे / फर्मचे नाव काळ्या यादीत नसल्याचे हमीपत्र जोडावे. |
| २. | ध्येय करिअर अकॅडमी | १. मागील पाच वर्षातील केवळ बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>२. संस्थेचे वेबपेज, वेबसाईट असलेबाबत पुरावे जोडावे.<br>३. स्वतंत्र वातानुकुलीत अभ्यासिका असल्याबाबत छायाचित्रे तसेच किमान किती विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>४. स्वतंत्र कार्यालयाचे छायाचित्र जोडावे.<br>५. वसतिगृहामध्ये सर्व सुविधांनी युक्त किती विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची सोय आहे ते नमूद करावे.तसेच वसतिगृहामध्ये CCTV यंत्रणेचे छायाचित्र जोडावे.<br>६. मागील ३ वर्षातील (सन २०१७-१८ ते २०१९-२०) लेखापरिक्षण अहवाल तसेच वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करावे.<br>७. शासकीय यंत्रणा/ विभाग यांचे सोबतचे कार्यारंभ आदेश / सामंजस्य करार जोडावे.<br>८. संस्थेचे स्वतंत्र Android आणि IOS मोबाईल ॲप तसेच Online प्रशिक्षण देण्याचे संसाधने Digital Studio याबाबतचे पुरावे जोडावे.<br>९. संगणक कक्ष विद्युत बॅकअप सह पुरावे जोडून संगणक संख्या नमूद करावी. तसेच ऑनलाईन टेस्ट सिरीज बाबत पुरावे जोडावे. |

उपरोक्त नमूद ई-निविदा धारकांनी तक्त्यात नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे योग्य स्वरुपात व सुस्पष्ट दस्त ऑनलाईन पोर्टल https://mahatenders.gov.in वर दि.२६/०२/२०२४ रोजी दु.१२.०० पर्यंत सादर करावी. सदर मुदतीनंतर कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर करण्यासाठी अन्य कोणत्याही संधीचा अथवा वाढीव मुदतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

**(डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण)**
**विभाग प्रमुख**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**